पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 26/11/2019 (मंगळवार)
(दुपार)

---

## एटीएम मशीनचे नुकसान

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत अर्धा कि.मी अंतरावर बॅकऑफ इंडीया भिवापुर येथे दिनांक 25/11/2019 चे 10:30 वा. ते 11:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– छगन गंभिरदास चोरमार, रा. परतवाडा पारडी नागपूर यांना बॅक ऑफ इंडीया शाखा भिवापूर येथुन फोनद्वारे माहिती मिळाली की, बॅक ऑॅफ इंडीया शाखा भिवापूरचे इमारतीत असलेले एटीएम मशीन रात्री दरम्यान अज्ञात आरोपीने फोडण्याचा प्रयत्न केला आहे. अशा माहिती वरून उमरेड भिवापूर परीसरातील सुपरवाईजर शिवशंकर दशरथ शिर्शीकर, रा. प्रचारनगर हुडकेश्वर, नागपूर यांनी भिवापूर येथे जावून एटीएम मशीनची दुपारी 12:30 वा. दर येवून पाहणी केली असता बी.ओ.आय चे एटीएम फोडण्याचा प्रयत्न अज्ञात आरोपीने केल्याचे दिसले त्यामूळे एटीएम मशीनचे नुकसान झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 379, 511 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा रेवतकर हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 12 कि.मी. अंतरावरील गुडेगाव जवळ येथे दिनांक 07/11/2019 चे 19:00 वा. दरम्यान मधुकर सदाशिव सिंगाडे(मृतक), वय 50 वर्ष, रा. उमरी हा त्याच्या एमएच–40/बीसी–0929 क्रमांकाच्या मोटरसायकलने रामटेक वरुन गावाला जात होता. दरम्यान मुसेवाडी मार्गाने गुडेगाव जवळ मोटरसायकल स्लिप झाल्याने त्यांच्या डोक्याला मार लागला. त्यांना उपचाराकामी प्रथम खाजगी रूग्णालय व नंतर ट्रामा मेडीकल कॉलेज, नागपुर येथे भरती केले असता दि 13/11/19 चे 08:00 वा. डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले होते. मर्गचे संबधित कागदपत्रे प्राप्त झाल्याने सदरचा मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा प्रमोद पाळके यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे कलम 174 जाफौ कायद्यान्वये मर्ग नोंद करण्यात आलेला आहे. पुढील तपास सफौ महेश नौरीया हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर